परिपत्रक

राजिप/अर्थ/लेखा/ईसीएस/एनईएफटी/ /१५.
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग, अर्थ विभाग.
दिनांक :- १८/०२/२०१५.

प्रति,

१) खाते प्रमुख......................................(सर्व), रा.जि.प.अलिबाग.
२) गट विकास अधिकारी, पं.स.....................(सर्व), रायगड जिल्हा.

**विषय :- अर्थ विभागामार्फत होणारी सर्व प्रकारची प्रदाने ईसीएस / एनईएफटी मार्फत करणेबाबत.**

संदर्भ - १) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.संकिर्ण-१०१०/प्र.क्र.६८/कोषा प्र-५, दि.१८.०४.२०११.
२) कार्यालयीन मंजूर टिपणी दिनांक १२/०२/२०१५.

संदर्भ क्र.१ चा शासन निर्णय व संदर्भ क्र.२ च्या मंजूर टिपणीनुसार दिनांक १ मार्च २०१५ पासून अर्थ विभागामार्फत होणारी सर्व प्रकारची प्रदाने उदा. कर्मचारी वेतन, भत्ते/भविष्य निर्वाह निधी /गटविमा /अंशदाने निवती वेतन, ई. तसेच पुरवठादार/ सेवापुरवठादार/ कंत्राटदार/ विविध योजनांतर्गत लाभार्थी/ परताव्यांची रक्कम / अग्रिमे इ. सर्व प्रदाने ही ईसीएस / एनईएफटी मार्फत करण्यात येणार आहेत. याबाबतच्या सर्व तरतुदी संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयानुसार लागू असतील.

त्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, यापुढे अर्थ विभागात देयके / प्रकरणे सादर करताना जोडपत्र-अ जोडणे बंधनकारक राहिल. सदर जोडपत्र नसलेली देयके / प्रकरणे आक्षेपानुसार परत पाठविण्यात येतील याची नोंद घ्यावी.

मंजूर झालेली देयके रोखशाखेकडे प्राप्त झाल्यापासून जास्तीत जास्त कार्यालयीन कामकाजाच्या तीन दिवसांपर्यंत बॅंकेकडे Payment Advice पाठविणेंत येईल. त्यामुळे मागणीदारांना धनादेशाकरिता रोखशाखेकडे येण्याची आवश्यकता राहणार नाही. यशस्वी प्रदानानंतर बॅंकेकडून प्राप्त होणारा UTR Number हाच प्रदानाचा पुरावा राहील. तसेच पुढील आदेश होईपर्यंत शासकीय कर / शासन भरणा / विजबिले / दूरध्वनी देयके / भाडेपट्टी / विमा, इ.ची देयके मात्र धनादेशादवारे पारित करण्यांत येतील.

यापुढे सर्व विभागप्रमुख व गट विकास अधिकारी यांनी दिनांक १ एप्रिल २०१५ पासून, त्यांना अर्थ विभागामार्फत प्राप्त होणा-या तरतुदींतून होणारी प्रदाने ही याचप्रमाणे ईसीएस / एनईएफटी मार्फत प्रदान करावीत. याबाबतचे सर्व निकष संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयानुसार लागू राहतील याची नोंद घ्यावी.

सोबत - जोडपत्र-अ

मुख्य कार्यकारी अधिकारी,
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग.

शासन निर्णय, क्र.संकिर्ण-१०१०/प्र.क्र.६८/कोषा प्र-५, दि.१८. एप्रिल २०११ चे सहपत्र.

## जोडपत्र - अ

## ई सी एस / एन ई एफ टी दवारे प्रदाने प्राप्त करण्यासाठीचा तपशील

१) मागणीदार / पुरवठादार / कंत्राटदाराचे नांव / फर्मचे नांव

२) कार्यालयाचे नांव व पत्ता (ज्या प्रकरणी लागू आहे)

३) बँक खाते क्रमांक

४) बँक खात्याचा प्रकार

५) बँकेचे नांव

६) बँक शाखेचे नांव व पत्ता

७) बँक शाखेचा संकेतांक

८) एम.आय.सी.आर. क्रमांक

९) आय.एफ.एस.सी. संकेतांक

दिनांक :- कंत्राटदार / पुरवठादार / मागणीदाराची सही.

## बँकेचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यांत येते की, वरील माहिती मी तपासून पाहिली असून ती योग्य आहे.

शाखा प्रमुख

...............................(बँके शाखेचे नांव व शिक्का)